# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १८२-२२** **दिनांक :- १५/०६/२०२२**

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये महाराष्ट्र सुरक्षा बलाचे २५० जवान कर्तव्यासाठी दाखल.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये मनुष्यबळ अपुरे असल्याने पोलीस बंदोबस्त, नाकाबंदी व इतर दैनंदिन कामकाजामध्ये मदत करण्याकरिता महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ५०० जवान मिळावे यासाठी शासनाकडे मागणी करुन पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानुसार शासनाने महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान देण्याचे मंजुर करुन पहिल्या टप्यामध्ये मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये दिनांक १५/६/२०२२ रोजी २५० जवान कर्तव्यासाठी हजर झाले असून ५० अधिक महिला सुरक्षा रक्षक दिनांक २०/६/२०२२ रोजी हजर होणार आहेत. पोलीस ठाणे व इतर शाखा येथील मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेवून त्यांचे वाटप करण्यात आले असून कर्तव्यासाठी हजर झालेल्या जवानांना मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र, कामकाज व त्यांना देण्यात येणाऱ्या कर्तव्याबाबत माहिती देण्यात आली.

पोलीस आयुक्तालयामध्ये नव्याने कर्तव्यासाठी हजर झालेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना मा. श्री. सदांनद दाते, पोलीस आयुक्त यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी पोलीसांसोबत कर्तव्य करतांना त्यांनी सामान्य नागरिकांच्या अपेक्षित कामांना प्राधान्य देवून तसेच महाराष्ट्र पोलीसांच्या ‘सद्रक्षणाय-खलनिग्रहणाय’ या ब्रिद वाक्याप्रमाणे कर्तव्यनिष्ठ राहून काम करणे अपेक्षित असल्याबाबत मत व्यक्त केले आहे.






----ooo---